सत्र खटला क्र. ७२/२०२३
सरकार -वि- आकाश
<u>निशाणी क्रमांक - ३९</u>

## सरकारतर्फे साक्षीदार क्र.०१ याची जबानी

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की

**माझे नांव – राजेंद्रकुमारसिंग बसनसिंग राजुपत**

**वय - ४५ वर्ष, व्यवसाय – नोकरी (बसचालक)**

**राहणार - दुधलगांव बु., ता. मलकापूर, जि. बुलढाणा**

### अभियोग पक्षातर्फे सरतपास विधिज्ञ श्री. एस. एच. जोशी

०१. घटना दि. २३.०५.२०२३ रोजी दुपारी ०४.३० वाजता चारखंबा चौक मलकापूर येथे घडली. त्यावेळी मी मलकापूर डेपामध्ये एस.टी. बस चालक म्हणून कार्यरत होतो. माझा बॅच क्र. ५००६९ असा आहे. त्यादिवशी मी मलकापूर येथून नरवेल येथे एस.टी.बस घेऊन जात असतांना चारखंबा चौकात आलो. त्यावेळी माझ्या एस.टी.समोर एक जीप उभी होती त्यामुळे बसला जायला जागा नव्हती. त्यावेळी समोरून एम.एच.१९-सी.यु.-०८९८ ही डस्टर गाडी आली. त्यावेळी सदर गाडी जात असतांना आरोपीने मला "तुया आईचा भोसडा, डोळे वटारून काय बघतो" अशी शिवीगाळ केली. त्यानंतर त्याने मला बसचा दरवाजा उघडून मारहाण सुरु केली. बसचा वाहक विनोद लक्ष्मीनारायण जैस्वाल व इतर लोकांनी आमचे भांडण सोडविले. त्यानंतर मी मलकापूर शहर पोलीस ठाणे येथे घटनेची फिर्याद दाखल केली. आता मला फिर्याद दाखविली. त्यावर माझी सही आहे ती **निशाणी क्रमांक ४०** वर आहे. सदर फिर्यादीवरून पोलीसांनी घटनेचा प्राथमिक अहवाल नोंदविला. सदर अहवाल मला दाखविला त्यावर माझी सही आहे. ती **निशाणी क्रमांक ४१** वर आहे. पोलीसांनी मला वैद्यकीय तपासणीकरीता उपजिल्हा रुग्णालय मलकापूर येथे पाठविले. मी पोलीसांना घटनास्थळ दाखविले होते. मी चालवित असलेल्या बसचा क्रमांक एम.एच. ४०-एन-८१५८ असा होता. मी

तपासादरम्यान पोलीसांना ओळखपत्र व परवाना दिला होता. सदर ओळखपत्राची मुळ प्रत माझ्या सोबत आहे. त्यावरून छायांकित प्रतीला **निशाणी क्रमांक ४२** तसेच पॅनकार्डला **निशाणी क्र. ४३,** तसेच वाहन चालविण्याचा परवाना **निशाणी क्रमांक ४४** देण्यात येत आहे. तपासादरम्यान पोलीसांनी माझे बयाण नोंदविले. आरोपी न्यायालयासमक्ष हजर आहे.

**उलट तपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. एस. एस. मोरे**

०२. हे म्हणणे खरे नाही की, माझी बस उभी असलेल्या ठिकाणी प्रवासी जीप सुध्दा उभी होती. हे म्हणणे खरे नाही की, सदर प्रवासी जीपमधून प्रवासी उतरत व चढत होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मला माझी बस बाजुने पुढे काढावी लागत होती व त्यावेळी डस्टरगाडी समोरून आली. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळावर युटर्न होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे समोरील येणारे वाहन वाहनचालकाला दिसत नाही. माझ्या बसमध्ये प्रवासी होते. मी फिर्याद व जबाब देतेवेळी आरोपीने मला "तुया आईचा भोसडा" अशी शिवीगाळ केली हे सांगितले होते. मी असेही सांगितले होते की, आरोपीने बसचा दरवाजा उघडला. सदर बाबी माझ्या फिर्याद व जबाबामध्ये का लिहल्या नाही याचे कारण मला सांगता येत नाही. घटना राजु बावस्कर नावाच्या व्यक्तीने सोडविले किंवा नाही हे मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचे नाव मला राजु बावस्कर याने सांगितले. माझ्या जबाबातील अधोरेखांकित भाग - अ मला वाचून दाखविला. तो मी पोलीसांना सांगितला नाही. माझ्या फिर्यादीमध्ये आरोपीचे नाव लिहलेले नाही. माझ्या बसमध्ये अंदाजे ३० ते ४० प्रवासी होते. आरोपीने माझ्याविरुध्द दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा दाखल झाला किंवा नाही हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या वेळी मी बस चुकीच्या बाजुने पुढे नेली त्यावरून मला आरोपीने बस

व्यवस्थित चालवा एवढेच म्हटले व याव्यतिरिक्त काही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आमच्यामधील बोलाचाली व्यतिरिक्त कुठलीही घटना घडली नाही. चारखंबा रस्त्यावर वाहतुक खुप असते व तेथे आजुबाजुला दुकानेसुध्दा आहे. आमची बोलाचाल चालु असतांना बरेच लोक तेथे जमले होते. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्यावेळी मी शासकिय कर्तव्यावर नव्हतो व मी सांगितल्याप्रमाणे कुठलीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

फेरतपास पुर्ण.

श्रवणोत्तर स्वीकृत,

दिनांक - २०/०१/२०२६

Digitally signed by RAJENDRAKUMAR BABASAHEB GIRI
Date: 2026.01.20 13:48:59 +0545

**(आर. बी. गिरी)**

अतिरिक्त सत्र न्यायाधीश मलकापूर

# CERTIFICATE

I certify that this order P.D.F. uploaded is a true and correct copy of original signed order.

| | | |
|---|---|---|
| Name of Court | : | Adhoc District Judge – 1 & Additional Sessions Judge, Malkapur. |
| Name of Stenographer | : | Shri. A. R. Chatur. (Senior Clerk) |
| Date of order | : | 20.01.2026 |
| Date of signed on order by Judicial Officer | : | 20.01.2026 |
| Date of uploading | : | 20.01.2026 |